**न्यायनिर्णय** **नियमीत फौ.ख.क्र.२०६/२०२२**

सरकार विरुध्द सौरभ कांबळे

| | |
|---|---|
| MHSN090012302022 | दाखल दिनांक – २०.१०.२०२२<br>नोंदणी दिनांक – २०.१०.२०२२<br>निकाल दिनांक – ११.०२.२०२६<br>कालावधी –०३ वर्षे ०३ महिने २२ दिवस |

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव, जि.सांगली यांच्या न्यायालयात**<br><br>(पिठासीन अधिकारीः– सतिष वाय. वाकचौरे)<br>(घोषित दिनांक ११.०२.२०२६)<br><br>**नियमीत फौजदारी खटला क्र.२०६/२०२२ नि.क्र.–४३**<br>**गु.र.क्र.–६०८/२०२१ पोलीस स्टेशन–तासगांव.** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता | श्रीमती एस.व्ही.पाटील. |
| आरोपी | **सौरभ गजानन कांबळे.**<br>वय : १९ वर्ष, धंदा : शेती,<br>रा. निमणी (पाचवा मैल), ता. तासगांव, जि. सांगली. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. ए.बी.डांगे. |
| **भाग–ब** | |
| गुन्हयाची तारीख | १६.१२.२०२१ |
| पहिली खबर दिनांक | २०.१२.२०२१ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २०.१०.२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २३.१२.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २७.०६.२०२३ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयांचा दिनांक | ११.०२.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## **आरोपींचा तपशील**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौरभ गजानन कांबळे | ०३.०१.२०२२ | ०५.०१.२०२२ | भा द वि कायदा कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम ४८ अन्वये | निर्दोष मुक्तता करण्यात आले. | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| १ | बाबासाहेब शंकर बनसोडे | फिर्यादी (निशाणी क्र.१८) |
| २ | अनिल मारुती पाटील | पंच साक्षीदार (निशाणी क्र.२२) |
| ३ | तानाजी पांडूरंग फराकट्टे | साक्षीदार (निशाणी क्र.२७) |
| ४ | ज्ञानेश्वर नारायण पाटील | पंच साक्षीदार (निशाणी क्र.२९) |
| ५ | रविंद्र विठ्ठल रांजणे | साक्षीदार (निशाणी क्र.३२) |
| ६ | गणेश संभाजी जाधव | तपासी अंमलदार (निशाणी क्र.३५) |

### ब. बचाव साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | १९ | तहसिलदारांचा गुन्हा दाखल करणेबाबतचा आदेश (साक्षीदार क्र.१) |
| २ | २० | फिर्याद (साक्षीदार क्र.१) |
| ३ | ३६ | घटनास्थळ पंचनामा (साक्षीदार क्र.६) |
| ४ | ३७ | जप्ती पंचनामा (साक्षीदार क्र.६) |
| ५ | ३८ | मुद्देमाल जमा केल्याची पावती (साक्षीदार क्र.६) |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | एम.आर.क्र.१०२/२०२२ | एक निळया रंगाचा लोखंडी साठा असलेली जुनी बैलगाडी, अंदाजे अर्धा ब्रास वाळूसह |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांकः–११.०२.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, कलम ४८ अन्वये चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२) दिनांक १६.१२.२०२१ रोजी, रात्री २.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी व

त्यांच्या सोबत रविंद्र राजंणे तहसिलदार, तानाजी पांडूरंग फराखटे तलाठी पुणदी असे येरळा नदीपात्रामध्ये अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणा–या वाहनांवर कारवाई करण्याकरीता गस्त करीत असताना, रात्री २.३० वाजेच्या सुमारास नागाव निमणी गावातील नागनाथ मंदिराच्या पाठीमागे एक बैलगाडी थांबलेली त्यांना दिसली. म्हणून त्यांनी बैलगाडीजवळ जावुन पाहिले असता, त्यामध्ये त्यांना अर्धा ब्रास वाळू साठा असल्याचे दिसुन आले. त्यांनी बैलगाडी चालकास बैलगाडी व वाळूबाबत विचारपूस केली असता त्याने सदर बैलगाडी त्याची स्वतःची असुन त्यातील वाळू येरळा नदीपात्रातून आणल्याचे सांगितले. त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने सौरभ दिलीप कांबळे असे सांगितले. वाळू उत्खनन व वाहतूकीबाबतचा परवाना आहे किंवा नाही असे त्याला विचारले असता, त्याने तो नसल्याचे सांगितले. तेव्हा फिर्यादीने नागाव गावातील दोन इसमांना पंच म्हणून बोलावुन घेतले व त्यांच्यासमक्ष बैलगाडी व वाळू साठयाचा पंचनामा केला. मा. तलसिलदार यांनी सदर बैलगाडी वाळूसह तहसिल कार्यालय, तासगांव येथे घेवुन येण्यास सांगितले. म्हणून फिर्यादीने आरोपीस बैलगाडी तहसिल कार्यालयात घेवुन ये असे सांगितले. तो त्याच्या मोटारसायकलने हळू हळू पूढे येत असताना आरोपीने त्याची बैलगाडी तेथून घेवुन पळाला. सदर बाब फिर्यादीने तहसिलदारांना कळविली. तेव्हा मा. तहसिलदार यांनी आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. परंतू, फिर्यादीस निवडणूक व अवकाळी शेतपिक नुकसान पंचनामे करण्याचे काम लागल्याने त्या दिवशी त्यांना पोलीस ठाण्यात तक्रार देता आली नाही. त्यानंतर दिनांक २०.१२.२०२१ रोजी फिर्यादीने सदर घटनेबाबत तासगांव पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

३) सदरच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गु.र.क्र.–६०८/२०२१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास पुर्ण करुन

आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले आहे.

४) आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कायदा, १८६० चे कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, कलम ४८(७) अन्वये दोषारोप नि.क्र.१६ वर निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने निशाणी क्र.१७ नुसार गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५) प्रस्तुत प्रकरणात आरोपीचे फौजदारी प्रकिया संहिताचे कलम ३१३ अनव्ये निवेदन निशाणी क्र.४० अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने त्याच्याविरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा बचाव घेतलेला आहे.

६) अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.व्ही. पाटील व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. ए.बी. डांगे यांचा युक्तिवाद ऐकला.

७) अभिलेखावरील पुरावा, दोन्ही पक्षाचे कथने व दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तिवाद लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात, त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १६.१२.२०२१ रोजी पहाटे २.३० वाजेच्या सुमारास मौजे निमणी येथील नागनाथ मंदिराच्या पाठीमागे ता. तासगांव, जि. सांगली आरोपीने येरळा नदीपात्रात अवैधरित्या वाळू उत्खनन करुन अर्धा ब्रास वाळू बैलगाडीद्वारे बेकायदेशीरपणे शासनाचा कोणताही परवाना नसताना चोरी करुन तीचा साठा केला आणि भा.द.वी. कलम ३७९ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| २ | वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याला | |

| | | |
|---|---|---|
| | वाळू उत्खनन करुन साठा करण्याचे कोणतेही अधिकार नसताना, विनापरवाना वाळू वाहतूक करुन तिचा साठा केला आणि महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, कलम ४८(७) अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ३. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## कारणमिमांसा

८) आरोपीविरुध्द ठेवलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षादवारे वर वर्णन केल्याप्रमाणे एकुण ६ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली तसेच सदर तोंडी पुराव्या व्यातीरिक्त वरीलप्रमाणे निशाणी क्र. १९ गुन्हा दाखल करण्याचा आदेश, निशाणी क्र. २० वर्दीजबाब, निशाणी क्र. ३६ घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ३७ जप्ती पंचनामा व निशाणी क्र. ३८ मुद्देमाल जमा केल्याची पावती या कागदपत्रावर अभियोग पक्षाने आपली भिस्त ठेवली आहे.

**मुद्दा क्र.१ करीता :**

९) आरोपीने भा.द.वी कलम ३७९ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने खालीलप्रमाणे बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

**अ.** गुन्हयात चोरीला गेलेली वाळू ही जंगम मालमत्ता आहे.

**ब.** सदर जंगम मालमत्ता वाळू ही दुस–या कोणी व्यक्तीच्या अगर शासनाच्या ताब्यात होती.

**क.** सदर वाळू आरोपीने शासनाच्या संमतीविना अप्रमाणिक उददेशाने त्याच्या ताब्यातून चोरली.

तसेच आरोपीने महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, कलम ४८(७) अन्वये गुन्हा

केल्याचे सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने, आरोपीने त्याला वाळू उत्खनन करुन साठा करण्याचे कोणतेही अधिकार नसताना, विनापरवाना वाळू वाहतूक करुन तिचा साठा केला ही बाब प्रामुख्याने सिध्द करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे बाबी सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाव्दारे तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्याचे विवेचन करणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते.

१०) साक्षीदार क्र. १, बाबासाहेब बनसोडे याच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.१२.२०२१ रोजी ते सोबत तलाठी तानाजी फराकट्टे व तहसिलदार रविंद्र रांजणे असे नागाव निमणी येथे गस्त करीत असताना, त्यांना नागनाथ मंदिराजवळ एक बैलगाडी वाळू ओतून तेथून निघण्याच्या तयारीत असताना दिसुन आली. त्या बैलगाडीजवळ आरोपी थांबलेला होता. तहसिलदार यांनी त्याला वाळू वाहतूकीचा पास आहे का असे विचारले असता त्याने पास नसल्याचे सांगितले व ती बैलगाडी त्याच्या मालकीची असल्याचे सांगितले. आरोपीस दंडात्मक कारवाईकरीता तहसिलदार कार्यालयात येण्याचे सांगितले असता व फिर्यादी त्यांची मोटारसायकल घेवुन बैलगाडीमागे जात असताना थोडे अंतर गेल्यानंतर आरोपीने बैलगाडी पळवुन तो अंधारात निघून गेला. त्यानंतर फिर्यादीने दोन पंचाना घेवुन नागनाथ मंदिराजवळ जावुन पंचनामा केला व दुस–या दिवशी तहसिलदारांनी लेखी आदेश देवुन गुन्हा दाखल करण्याचे सांगितले.

११) सदर साक्षीदाराने उलट तपासादरम्यान असे कथन केले आहे की, घटनेच्या दिवशी गस्ती पथकामध्ये त्याचे नाव समाविष्ट असल्याचा कोणताही कागद त्याने अभिलेखावर दाखल केलेला नाही. गस्त करण्यासाठी कोणती गाडी होती, ती कोण चालवित होते व तिचा काय क्रमांक होता हे जबाबात सांगितलेले नाही. त्यांनी घटनेच्या दिवसाची हालचाल नोंदवहीची प्रत अभिलेखावर दाखल केलेली नाही. बैलगाडीपेक्षा

दुचाकी वाहनाचा वेग जास्त असतो. घटनेच्या दिवशी त्यांनी आरोपीचे आधार कार्ड पाहिलेले नाही. घटनास्थळी असलेल्या बैलगाडीमध्ये वाळू नव्हती. घटनेच्या दिवशी बैलगाडीतून वाळू वाहतूक करताना त्यांनी स्वतः पाहिलेले नाही. तहसिलदार कार्यालयात आरोपीची ओळख परेड घेतलेली नाही. वरील प्रमाणे बाबी मान्य करुन, या व्यतीरिक्त विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१२) साक्षीदार क्र.२ अनिल पाटील हा पंच साक्षीदार असुन त्याने पुराव्यादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य होईल असे कोणतेही विधान केलेले नाही. सदर साक्षीदाराला फितूर घोषित करुन अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील यांनी त्याचा उलट तपास घेतला परंतू, उलटतपासादरम्यान विचारण्यात आलेल्या उत्तरसूचक प्रश्नांची सदर साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिली.

१३) साक्षीदार क्र.३ तानाजी पांडूरंग फराकट्टे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.१२.२०२१ रोजी पहाटे २.३० वाजेच्या सुमारास ते व सोबत निमणी येथील तलाठी बाबासो बनसोडे व तहसिलदार रविंद्र रांजणे असे नागाव निमणी येथे गस्त करीत असताना नागोबा मंदिराच्या पाठीमागे त्यांना अर्धा ते पाऊण ब्रास वाळू भरलेली बैलगाडी दिसली. सदर बैलगाडी शेजारी एक इसम उभा होता. त्याचेकडे तहसिलदारांनी वाळू परवान्याबाबत विचारपूस केली असता, त्याने त्याचेकडे परवाना नसल्याचे सांगितले. तहसिलदारांनी त्याला वाळूने भरलेली गाडी तहसिलदार कार्यालयात घेवुन येण्यास सांगितले. परंतू, सदर इसम पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी त्याचा पाठलाग केला व त्याला बैलगाडीसह तहसिलदार कार्यालयात घेवुन गेले.

१४) सदर साक्षीदाराच्या उलट तपासात असे आले आहे की, घटनेच्या दिवशी गस्ती पथकामध्ये त्यांचे नाव समाविष्ट असल्याचा कोणताही कागद त्यांनी अभिलेखावर दिलेला नाही. वाहन गस्त करण्यासाठी जात असताना त्याची हालचाल

नोंदवहीला नोंद असल्याबाबत कोणताही पुरावा त्यांनी याकामी दिलेला नाही. तसेच गस्त करण्याकामी वापरलेली गाडी कोणती होती, ती कोण चालवित होते व तीचा क्रमांक काय होता हे देखील त्यांनी नमुद केलेले नाही. त्यांनी आरोपीचा पाठलाग केला व त्याला तहसिलदार कार्यालयात नेले हे त्यांनी प्रथमच न्यायालयात सांगितले होते. आरोपीचे आधार कार्ड पाहून त्याची खात्री केली नाही. वरील प्रमाणे बाबी मान्य करुन, या व्यतीरिक्त विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१५) साक्षीदार क्र.४ ज्ञानेश्वर नारायण पाटील याच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.१२.२०२१ रोजी पहाटे २.३० वाजता त्यांना तहसिलदारांनी नागाव निमणी येथे बोलाविले होते. घटनास्थळी त्यांना वाळू ओतलेली दिसली. सकाळी १०.०० वाजता तलाठी बनसोडे यांनी त्यांच्या समक्ष वाळू संदर्भात पंचनामा केला.

१६) सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये असे आले आहे की, तो तंटामुक्ती अध्यक्ष असल्याने नागाव निमणी तलाठी यांच्यासोबत त्याच्या नेहमीच गाठी भेटी होत असतात. त्यामुळे ते त्यांच्या चांगलेच ओळखीचे आहेत. तलाठी यांच्यासोबत चांगले संबंध असल्याने त्यांच्या सांगण्यावरुन साक्षीदाराने छापील फॉर्मवर सहया केल्या आहेत. त्यांच्या समक्ष बैलगाडीचे कोणतेही मोजमाप झालेले नाही. वरील प्रमाणे बाबी मान्य करुन, या व्यतीरिक्त विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांची उत्तरे साक्षीदाराने नकारार्थी दिली.

१७) साक्षीदार क्र.५ रविंद्र विठ्ठल रांजणे यांनी त्याच्या जबाबात असे कथन केले आहे की, दिनांक १६.१२.२०२१ रोजी पहाटे २.३० वाजेच्या सुमारास ते सोबत निमणी गावचे तलाठी बाबासो बनसोडे व पुणदी तलाठी फराकट्टे असे गस्त करीत होते. तेव्हा नागोबा मंदिराच्या पाठीमागे त्यांना एक बैलगाडी दिसली. ती अर्धा ब्रास वाळूने भरली होती. सदर गाडीशेजारी एक इसम उभा होता. त्याला थांबून त्यांनी वाळूबाबत परवाना विचारला असता त्याने त्याचेकडे परवाना नसल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी सदर

गाडी वाळूसह तहसिलदार कार्यालयात घेवुन येण्यास सांगितले. परंतू, सदर इसमाने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, तलाठी याने त्याचा पाठलाग करुन त्याला बैलगाडीसह तहसिलदार कार्यालयात आणले व त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

१८) सदर साक्षीदाराच्या उलट तपासात असे आले आहे की, घटनेच्या दिवशी गस्ती पथकामध्ये तलाठयांची नावे असल्याचा कोणताही कागद त्यांनी सदर कामात दाखल केलेला नाही. गस्त करण्यासाठी वापरलेल्या वाहनाची हालचाल नोंदवहीला नोंद असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच गस्त करण्यासाठी कोणती गाडी वापरली होती व तीचा क्रमांक काय होता हे देखील त्यांनी जबाबात सांगितलेले नाही. बैलगाडीची लांबी–रुंदी पंचनाम्यात नमुद नाही. त्यांनी आरोपीला वाळू वाहतूक करताना प्रत्यक्ष पाहिलेले नाही. वरील प्रमाणे बाबी मान्य करुन, या व्यतीरिक्त विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

१९) साक्षीदार क्र.६ गणेश संभाजी जाधव यांनी त्याच्या जबाबात असे कथन केले आहे की, दिनांक २०.१२.२०२१ रोजी सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. आदेशासोबत वर्दीजबाब, छापील एफआयआर, तहसिलदार कार्यालयाची गुन्हा दाखल करण्याचे पत्र व घटनास्थळ पंचनामा ही कागदपत्रे तपासादरम्यान त्यांच्याकडे देण्यात आली. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले व प्रस्तुत घटनेचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

२०) सदर साक्षीदाराच्या उलट तपासात असे आले आहे की, आरोपीला वाळू वाहतूक करताना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले नाही. जप्त बैलगाडी ही प्रत्येक शेतक–याकडे असते. या व्यतीरिक्त विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली.

२१) एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, निशाणी

क्र. २० वरील वर्दीजबाबात अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, गस्त करीत असताना, त्यांना नागनाथ मंदिराच्या पाठीमागे एक बैलगाडी थांबलेली दिसली, जवळ जावुन पाहिले असता, त्यामध्ये त्यांना अर्धा ब्रास वाळू असल्याचे दिसुन आले. तसेच त्यांनी बैलगाडी व वाळू तहसिलदार कार्यालयात घेवुन ये असे आरोपीला सांगितले व ते त्यांच्या मोटारसायकलने हळू हळू पूढे येत असताना आरोपी हा बैलगाडी घेवुन पळून गेला असे कथन केले आहे. परंतू, साक्षीदार क्र. १ बाबासो बनसोडे फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये नागनाथ मंदिराजवळ एक बैलगाडी वाळू ओतून तेथून निघण्याच्या तयारीत असताना दिसुन आली. तसेच त्याने आरोपीला बैलगाडी व वाळू तहसिलदार कार्यालयात घे असे सांगून तो त्याची मोटारसायकल बैलगाडी मागे घेवुन जात असताना आरोपी हा बैलगाडी घेवुन अंधारात पळून गेला असे सांगितले आहे. फिर्यादीच्या वर्दीजबाबामध्ये व साक्षीपुराव्यामध्ये या ठिकाणी विरोधाभास असल्याचे दिसुन येते. तसेच साक्षीदार क्र. ३ तानाजी फराकट्टे व साक्षीदार क्र. ४ रविंद्र विठ्ठल रांजणे यांनी त्यांच्या पुराव्यात सदर बैलगाडी त्यांना वाळून भरलेली दिसली असे कथन केले आहे. तसेच साक्षीदार क्र. ३ तानाजी फराकट्टे यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपीस बैलगाडी वाळूसह तहलिसदार कार्यालयात घेवुन येण्यास सांगितले असता, तो पळून जाण्याचा प्रयत्न करु लागल्याने त्यांनी त्याचा पाठलाग करुन बैलगाडीसह त्याला तहसिलदार कार्यालयात नेले असे कथन केले आहे. तसेच साक्षीदार क्र. ५ रविंद्र विठ्ठल रांजणे यांनीदेखील त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला म्हणून तलाठी साक्षीदारांनी त्याचा पाठलाग करुन बैलगाडीसह त्याला तहसिलदार कार्यालयात आणले असे कथन केले आहे. सदर तीनही साक्षीदार हे महसुल विभागाचे असुन त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांच्या पुराव्यामध्ये एकसंगता आढळून येत नाही. वरीलप्रमाणे महसुल विभागाच्या साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यामध्ये विसंगती आढळून येते.

२२) अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या महसुल विभागाच्या तीनही साक्षीदारांनी उलट तपासादरम्यान त्यांचे नाव गस्ती पथकामध्ये समाविष्ट असल्याबाबतचा कोणताही कागद अभिलेखावर दिला नसल्याचे मान्य केले आहे. तसेच गस्त करण्यासाठी वापरलेली गाडी कोणती होती, कोण चालवित होते व तिचा क्रमांक काय होता तसेच तीची हालचाल नोंदवहीला केलेली नोंद याबाबतचा देखील कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नसल्याचे देखील मान्य केले आहे. सदर तीन साक्षीदारांव्यक्तीरिक्त तेथे हजर असलेल्या पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान केलेले नाही. यावरुन अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे फिर्यादी व सोबतचे साक्षीदार हे घटनेच्या दिवशी गस्त करीत होते ही बाब पुराव्यानिशी सिध्द होत नाही. वरीलप्रमाणे पुराव्यावरुन अभियोग पक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो.

२३) साक्षीदार क्र. ४ ज्ञानेश्वर पाटील हे पंच साक्षीदार असुन त्यांनी केवळ तलाठी यांच्यासोबत असलेल्या ओळखीमुळे छापील फार्मवर सहया केल्याचे मान्य केले आहे. महसुल विभागाच्या तीनही साक्षीदारांनी आरोपीचे आधार कार्ड पाहिलेले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच गाडीमध्ये वाळू नव्हती हेदेखील उलट तपासामध्ये मान्य केले आहे. एकुणच अभियोग पक्षाने तपासलेल्या सर्व साक्षीदारांनी आरोपीला बैलगाडीतून वाळू वाहतूक करताना पाहिलेले नाही ही बाब मान्य केली आहे. आरोपी गाडी चालवित होता व त्याच्या बैलगाडीमध्ये वाळू होती हे सिध्द करण्यासाकरीता अभियोग पक्षाने सदर बैलगाडीचा आरोपीसह व वाळूसह असलेला कोणताही फोटो अभिलेखावर दाखल केलेला दिसत नाही. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांकडे गस्त करण्यासाठी गाडी होती तसेच फिर्यादी यांचेकडे मोटारसायकल होती ही बाब साक्षीदाराने पुराव्यादरम्यान सांगितली आहे. त्यामुळे बैलगाडीचा वेग व साक्षीदारांकडे असलेल्या वाहनाचा वेग पाहिला असता आरोपी बैलगाडी घेवुन पळून गेला या कथनामध्ये विश्वासार्हता वाटत

नाही. यास्तव अभिलेखावर आलेल्या पुराव्यातून अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने विना परवाना बेकायदेशीररित्या येरळा नदीपात्रातून वाळू चोरी केली व उत्खनन करण्याचा व साठा करण्याचा कोणताही अधिकार नसताना त्याने वाळूचा साठा केला ही बाब सिध्द होत नाही अगर अभिलेखावर आलेला पुरावा आरोपीविरुध्द असलेले गुन्हयाचे घटक सिध्द करण्यासाठी पुरेसा पुरावा होत नाही.

२४) वरील सर्व बाबीं विचारात घेऊन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, अभियोग पक्षाने अरोपीविरुध्द गुन्हयाचे कोणतेही घटक संशयापलीकडे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी हा प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे या मतांपर्यंत मी येऊन पोहचलेलो असल्याने मुददा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुददा क्र. ३ चे उत्तरार्थ, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी सौरभ गजानन कांबळे याची भारतीय दंड विधान कलम ३७९ व महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, कलम ४८(७) मधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) जप्त मुददेमाल एक निळया रंगाचा लोखंडी साठा असलेली जुनी बैलगाडी ही मुळ मालकास परत दिली आहे किंवा नाही याबाबत कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दिसुन येत नाहीत. यदाकदाचित सदर बैलगाडी मुळ मालकास तात्पुरती परत दिलेली असल्यास तिचा सुपूर्तनामा अपील कालावधीनंतर रद्द करुन मुळ मालकाचा सदर बैलगाडीवरील अंतरिम ताबा कायम करण्यात यावा. तसेच सदर बैलगाडी मुळ मालकास परत दिलेली नसल्यास अपील कालावधीनंतर ती मुळ मालकास मालकीबाबत योग्य ती शहानिशा करुन परत करण्यात यावी.

४) जप्त मुददेमाल अंदाजे अर्धा ब्रास वाळु संबंधित महसुल अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाही करणेकामी पाठविणेत यावे.

५) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये आरोपीने रु.१५०००/– चा वैयक्तिक मुचलका देण्याची पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)**

SATISH YASHWANT WAKCHAURE Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE Date: 2026.02.12 16:43:11 +0530

तासगांव. ( एस.वाय. वाकचौरे )

दिनांकः ११.०२.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Abhay Arvind Randive. |
| Court | : | Shri. S.Y. Wakchaure<br>J.M.F.C., Tasgaon, Dist-Sangli. |
| Date of Judgment | : | 11.02.2026 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 12.02.2026 |
| Judgment uploaded on | : | 12.02.2026 |